ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख ८ मे, १९५७ | अंक १९

## विविध माहिती

**अमेरिकेंतील ॲस्पिरिनचा खप**—अमेरिकेंतील लोकांना दरसाल ६,००० टन ॲस्पिरिन लागतें, असा हिशोब आरोग्य-विषयक एका संस्थेनें केला आहे. दुसऱ्या कोठल्याहि देशांत डोकेंदुखीवरील ह्या औषधाचा इतका खप नाहीं. दुसरी मौज अशी कीं, प्राप्तीवरील कर ज्या प्रमाणांत वाढत आहे त्याच प्रमाणांत ॲस्पिरिनचा खपहि वाढत आहे.

**तंत्रज्ञांची वाढती गरज**—मध्यप्रदेशांत भिलई येथें पोलादाचा कारखाना व भोपाळ येथें विजेची भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना निघणार आहे. ह्या दोन्ही कारखान्यांना मिळून सुमारें ११,००० तंत्रज्ञ लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. ८,००० तंत्रज्ञ पोलादाच्या कारखान्यासाठी व ३,००० तंत्रज्ञ विजेच्या भारी यंत्रसामुग्रीच्या कारखान्यासाठी लागतील.

**वैद्यकीय नियतकालिकाची मागणी**—पॅसिफिक महासागरांत ब्रिटन जो हैड्रोजन बॉबचा प्रायोगिक स्फोट करणार आहे, तो रद्द करावा अशी मागणी ‘ लान्सेट ’ ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश वैद्यकीय साप्ताहिकानें केली आहे. ह्या प्रयोगांनीं मासे खाणाऱ्या लोकांना फारच धोका उत्पन्न होईल, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

**जपानमधील अपघाती मृत्यु**—जपानच्या पोलिस खात्यानें अपघातांत सापडून मृत्यु पावलेल्या लोकांबद्दल आंकडेवार माहिती प्रसिद्ध केली आहे. ह्या माहितीप्रमाणें, जपानमध्यें रोज १,००० माणसें अपघातांत मृत्यु पावतात. वेगानें धावणाऱ्या भाड्याच्या मोटारी व आगी ह्या दोन कारणांनीं सर्वांत अधिक दारुण अपघात होतात.

**हें आव्हान नव्हे हो !**—‘केरळमधील कम्युनिस्ट सरकारनें सुशिक्षित बेकारांना कामें देण्याचा व इतर प्रश्न सोडविले तर आपण स्वतःच कम्युनिस्ट होऊं’ असे उद्गार भारताचे अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं मद्रास येथील एका सभेंत काढले. लगेच ते म्हणाले कीं, ह्यांचा अर्थ कम्युनिस्टांना माझें आव्हान आहे असा मात्र नाहीं.

**एंजिनिअरिंग कॉलेजमध्यें अधिक जागा**—येत्या शैक्षणिक वर्षापासून हैद्राबादमधील उस्मानिआ विद्यापीठाच्या एंजिनिअरिंग कॉलेजमधील निरनिराळ्या विभागांत मिळून १२० अधिक उमेदवारांना प्रवेश देण्यांत येणार आहे. आतापर्यंत त्या कॉलेजांत दरसाल फक्त ११० नव्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येत असे.

**महारोगविषयक परिषद**—आंतरराष्ट्रीय महारोग परिषदेचें ७ वें अधिवेशन १९५८ सालच्या डिसेंबर महिन्यांत नवी दिल्ली येथें भरविण्यांत येणार आहे. परिषदेचें काम एक आठवडा चालेल. महारोगाला आळा घालण्यासाठी परिषदेंत उपाय सुचविण्यांत येतात. अनेक देशांतील प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**पान खाणें ही चैन आहे**—उत्तर प्रदेशाच्या विधान सभेंत सरकारतर्फे असें सांगण्यात आलें कीं, राज्यांतील सुपारीच्या विक्रीवर घेण्यांत येत असलेला कर चालू ठेवण्यांत येणार आहे. सुपारीच्या व्यापारांत चांगला नफा असतो आणि पान खाणें ही चैन असल्यामुळें सुपारीवर विक्रीकर बसविणें गैर नाहीं, असा खुलासाहि करण्यांत आला.

**म्हैसूर सरकारला कर्ज**—१९५६-५७ च्या आर्थिक वर्षासाठी भारत सरकारनें म्हैसूरच्या सरकारला १ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. राज्य सरकारनें विजेच्या पुरवठ्यांत वाढ करण्यासाठी ज्या योजना आंखल्या आहेत, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**फोर्ड फौंडेशनची पोलंडला मदत**—पोलंडशीं सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीनें अमेरिकेमधील फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें ५ लाख डॉलर्सची रक्कम मंजूर केली आहे. उभयता देशांमधील शिक्षक व विद्यार्थी ह्यांनीं एकमेकांच्या देशांत जाऊन परिचय वाढवावा म्हणून ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**जागतिक बँकेकडून कर्ज**—मुंबईला उभारण्यांत यावयाच्या एका नव्या विद्युत्‌केंद्रासाठी जागतिक बँकेनें सुमारें ९८ लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर करण्याची तयारी दाखविली आहे. कोयना नदीवरील केंद्रासाठीहि बँकेकडून मोठें कर्ज मिळणार असल्याची वार्ता आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बॉंबे रेव्हेन्यु ट्रायब्यूनल

### अर्जदारांना सवलत

बॉंबे रेव्हेन्यु ट्रायब्यूनलच्या मुंबई येथील कचेरींत अपिलें किंवा अर्ज करतांना अर्जदारांची होणारी गैरसोय टाळतां यावी म्हणून मुंबई शेतजमीन आणि कूळवहिवाट कायद्याखालीं करावयाचे तपासणी अर्ज, अर्जदार रहातो तेथून जवळच असलेल्या विभागीय कचेरीमध्यें करतां येतील. तपासणी अर्जांची सुरवातीपासून अखेरची वासलात लावीपर्यंतचे सर्व व्यवहार सर्वसाधारणतः विभागीय कचेरीमार्फतच केले जातात. या व्यवस्थेमुळें संबंधित लोकांचा वेळ आणि पैसाहि वाचूं शकेल.

नाशिक, अहमदनगर, सोलापूर, पुणें, उत्तर सातारा, दक्षिण-सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यांतील अर्जदार आपले तपासणी अर्ज बॉंबे रेव्हेन्यु ट्रायब्यूनलच्या पुणें येथील डेप्युटि रजिस्ट्रारच्या पुढें प्रत्यक्ष किंवा पोस्टानें करूं शकतील; व साबरकांठा, बनासकांठा, मेहसाणा, अहमदाबाद, खेडा, अमरेली, पंचमहाल, बडोदा व भडोच या जिल्ह्यांतील अर्जदार आपले तपासणी अर्ज प्रत्यक्ष किंवा पोष्टानें बॉंबे रेव्हेन्यु ट्रायब्यूनलच्या अहमदाबाद येथील डेप्युटि रजिस्ट्रारच्या पुढें करूं शकतील.

सुरत, पश्चिम खानदेश, डांग, पूर्व खानदेश, ठाणें, मुंबई, उपनगर जिल्हा, कुलाबा आणि रत्नागिरी या जिल्ह्यांतील मुंबई शेतजमीन व कूळवहिवाट कायद्याखालील तपासणी अर्ज मुंबई येथील कचेरींत स्वीकारण्यांत येतील.

या ट्रायब्यूनलच्या अधिकारक्षेत्राखाली येणाऱ्या इतर कायद्याखाली करण्यांत येणारे राज्यपुनर्रचनापूर्वी मुंबई राज्याच्या जिल्ह्यांतील अर्ज व अपिलें मुंबई येथील कचेरींतच स्वीकारण्यांत येऊन त्यांची व्यवस्था लावण्यांत येईल.

---

### आयुर्विम्याचा प्रसार करण्याची योजना

भारत सरकारच्या आयुर्विमा कॉर्पोरेशननें देशांतील सर्व लोकांच्या थरांत विमा लोकप्रिय व्हावा म्हणून प्रयत्न करण्याचें ठरविलें आहे. हें साध्य करण्यासाठी १५ मे पासून एक नवीन योजना अंमलांत आणण्याचें ठरलें आहे. त्या दिवसापासून जनता इन्शुअरन्स पॉलिसी स्कीम ह्या नांवाखाली एक योजना चालूं करण्यांत येणार आहे. विमा उतरण्याची प्रथा व संवय शहरांतील व खेड्यांतील सामान्य माणसापर्यंत पोंचावी, ह्या हेतूनें वरील योजना आखण्यांत आली आहे. छोटीं–मोठीं शहरेंहि योजनेच्या कक्षेंत सामील होतील. राज्य सरकारांच्या नोकरींत असलेल्या नोकरांचे विमे उतरविण्याबाबत त्यांचें मत अजमावण्यांत येत आहे. अशा प्रकारचे विमे उतरल्यामुळें राज्य सरकारांच्या नोकरांना आर्थिक शाश्वति लाभेल आणि बचत करण्याची संवयहि होईल असें सांगण्यांत येत आहे. जनता पॉलिसीची योजना सामान्यपणें अशी आहे. पॉलिसीची दर्शनी किंमत २५० रुपयांपासून १,००० रुपयांपर्यंत असेल. विम्याचे हप्ते विमेदाराला मासिक द्यावे लागतील. पहिला हप्ता रोख रकमेचा भरावा लागेल. पण पुढें मात्र हप्त्याच्या रकमेइतकीं तिकिटें दिल्यास तींहि घेण्यांत येतील. योजना प्रथम उत्तर भारतामधील व दक्षिण भारतामधील एकएका औद्योगिक व ग्रामीण विभागांत चालूं करण्यांत येईल. राज्य सरकारांच्या नोकरींतील ज्यांचे सुरवातीचे पगार महिना २०० रुपयांपेक्षा कमी असतील त्यांना ३,००० रुपयांची हयातींतील पॉलिसी देण्यांत येईल. मात्र त्यांनीं स्वतः अशीच पॉलिसी घेतली असली पाहिजे.


खर्चांत बचत करा व पैसा शिलकींत टाका

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

जनता बचत योजना
व्याज : २½ टक्के




शाखा:
फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

कण आणि क्षण
ह्या अत्यंत लोकप्रिय ( दोन वर्षांत दोन मराठी व दोन गुजराती आवृत्त्या ) पुस्तकाचे कर्ते
श्री. श्री. वा. काळे संपादक, "अर्थ" ह्यांचें

पुढे पाऊल

चित्ताकर्षक विवेचन असलेल्या मार्गदर्शक लघुनिबंधांचा संग्रह.
पृ. सं. १३१ ] आर्यभूषण प्रेस, पुणें ४. [ किंमत १ रु.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: —श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



किर्लोस्कर

अिलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. ८ मे, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारत–ऑस्ट्रेलिआ औद्योगिक सहकार्य

ऑस्ट्रेलिआचें एक व्यापारी प्रतिनिधिमंडळ गेले कांहीं दिवस भारताच्या दौऱ्यावर आलें होतें. भारताच्या बाजारपेठेची पहाणी करून ऑस्ट्रेलिअन मालाला भारतांत कितपत वाव आहे तें अजमावण्याच्या हेतूनें हें मंडळ आलें होतें. प्रतिनिधि-मंडळाचे नेते मि. जॉन जी. हर्ले ह्यांनीं दौऱ्याच्या अखेरीस दिल्ली येथें पत्रकारांना मुद्दाम मुलाखत देऊन आपल्या दौऱ्या-विषयीं माहिती दिली. ते म्हणाले कीं ऑस्ट्रेलिअन कंपन्या आणि भारतीय कंपन्या ह्यांच्या सहकार्यानें भारतांत एंजिनि-अरिंगचे कारखाने काढण्यास चांगला वाव आहे असें मंडळास आढळून आलें. भारतांत ऑस्ट्रेलिअन भांडवल गुंतविणें आज कितपत शक्य आहे, हा प्रश्नच आहे. प्रतिनिधि–मंडळाचें मत असें आहे कीं, ह्या बाबतींत ऑस्ट्रेलिआंतील लोकमत फारसें अनुकूल नाहीं. कारण, खुद्द ऑस्ट्रेलिआलाच आपल्या विकासा-साठीं परदेशीय भांडवलाची गरज भासत आहे. तथापि, आजहि कांहीं क्षेत्रांत भारत व ऑस्ट्रेलिआ ह्यांचें सहकार्य घडून आलेलें आहे; आणि आणखीहि कांहीं बाबतींत तें घडून येण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलिआनें भारताला भांडवली मालाचा पुरवठा करावा आणि त्याची किंमत कालांतरानें घेण्याचें मान्य करावें अशी एक सूचना भारत सरकारनें मांडली आहे. ह्या बाबतींत ज्या सूचना करण्यांत आल्या आहेत त्या नवीन आहेत आणि म्हणून त्यांचा अधिक अभ्यास करणें जरूर आहे. आयात-निर्यात व्यापाराला लागणारा पैसा पुरविणारी अशी खास बँकिंगची संस्था ऑस्ट्रेलिआंत नाहीं. म्हणून वरील सूचनेची अधिक तपासणी करणें अधिक जरूरीचें झालें आहे.

प्रतिनिधिमंडळाबरोबर ऑस्ट्रेलिआंतील बँकांचे कांहीं अधिकारी आले होते. त्यांनीं भारतामधील व्यापाऱ्यांकडून आलेल्या सुमारें २०० विचारणांचा अभ्यास केला. मद्रास व कलकत्ता येथील व्यापारी समाजांत ऑस्ट्रेलिआशीं व्यापारी संबंध वाढविण्यासंबंधी विशेष आस्था दिसून आली. ह्या बाबतींत बँकांच्या प्रतिनिधींचें असें मत झालें आहे कीं भारताच्या आयात परवान्यांच्या धोरणांत जर सुधारणा झाली तर ऑस्ट्रेलिआंतील व्यापारी व भारतामधील व्यापारी ह्यांच्या दरम्यान अधिक निकटचे संबंध प्रस्थापित करतां येतील. भारताच्या दौऱ्यावर असतांना भारत सरकार स्वतः करीत असलेल्या व्यापाराबद्दल प्रतिनिधिमंडळाला बरीच माहिती मिळाली. भारत सरकारच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें ह्याबाबतींत जें आश्वासन मंडळाला दिलें तें स्वागतार्ह आहे. कॉर्पोरेशननें प्रतिनिधिमंडळाला असें सांगितलें आहे कीं, राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें ज्या व्यापारी व्यव-हारांवर खास नियंत्रण करणें आवश्यक असेल तेवढेच व्यवहार कॉर्पोरेशनमार्फत करण्यांत येतील. एकंदरीनें प्रतिनिधिमंडळाला वाटलें होतें त्यापेक्षा बऱ्याच अधिक प्रमाणांत त्याचा दौरा यशस्वी झाला आहे. ह्या दौऱ्यांत झालेल्या परिचयाची वाढ करून व्यापारी संबंध अधिक दृढ करतां येतील अशी आशा आहे. विशेषतः एंजिनिअरिंगच्या धंद्याला लागणारी यंत्रसामुग्री, शेतीचीं यांत्रिक अवजारें, मोटारींचे सुटे भाग, इत्यादि बाबतींत व्यापारवृद्धि करण्यास चांगला वाव आहे. त्याशिवाय, भारता-मधील दूधदुभत्याच्या धंद्याला जीं आधुनिक उपकरणें लागतात तींहि ऑस्ट्रेलिआ पुरवूं शकेल.

---

## भारतामधील तांदुळाचें उत्पादन

भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यानें देशांतील तांदुळा-च्या उत्पादनाविषयीं एक पत्रक काढून त्याबाबतची माहिती जाहीर केली आहे. चालू सालीं भाताच्या लागवडीखालील एकूण जमीन आणि तांदुळाचें उत्पादन ह्या दोन्ही बाबतींत उच्चांक गाठण्यांत आला आहे. भाताखालील जमिनीचें एकूण क्षेत्र ७·८२ कोटी एकर आहे, आणि तांदुळाचें उत्पादन २·८१ कोटी टन इतकें आहे. ह्याच्या खालोखाल १९५३–५४ सालचा उच्चांक आहे. त्या सालीं हेच आंकडे अनुक्रमें ७·७३ कोटी एकर आणि २·७८ कोटी टन असे होते. मागील वर्षीच्या आकड्यांशीं तुलना करतां भाताखालील जमिनींत १३,१०,००० एकरांची वाढ झालेली दिसून येते. हीच वाढ टक्केवारीच्या भाषेंत सांगावयाची तर १·७ टक्के अशी सांगतां येईल. उत्पादनांत १२,२६,००० टनांनीं वाढ झाल्याचें दिसतें. टक्केवारीच्या भाषेंत उत्पादनांतील वाढ ४·८ टक्के अशी आहे. भाताच्या लागवडीच्या क्षेत्रांत जी वाढ झाली आहे, तींत सर्व राज्यांचा थोडाबहुत भाग आहे. फक्त पश्चिम बंगाल व ओरिसा राज्यां-तील क्षेत्रांत मात्र वाढ झालेली नाहीं. आंध्र प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, मुंबई, मध्यप्रदेश, पंजाब व राजस्थान ह्या राज्यांतून भाताखालच्या जमिनींत विशेष वाढ झाल्याचें दिसून आलें. उत्तर प्रदेश सोडून भात पिकविणाऱ्या बहुतेक सर्व प्रदेशांतून उत्पादन वाढल्याचें आढळून आलें. उत्तर प्रदेशांत मात्र भाता-खालील जमीन वाढून सुद्धां उत्पादन घटलें. भाताच्या पिकाला प्रतिकूल असें हवामान आणि राज्यांतील नद्यांना आलेले पूर, ह्या दोन कारणांनीं उत्पादन घटलें.

---

**संत्रीं टिकविण्याचा कारखाना**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत नागपूर येथें संत्रीं हवाबंद डब्यांत भरून टिकविण्याचा एक कारखाना काढण्यांत येण्याचा संभव आहे. विदर्भातील संत्र्यांच्या लागवडीची पहाणी करण्यासाठी आलेले अमेरिकन तज्ज्ञ त्यासाठी नागपूर शहराची निवड करतील अशी वार्ता आहे. संत्र्यांची लागवड अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीनें करतां येईल असें त्यांचें मत आहे.

**बोलपटाच्या धंद्याला मदत**—बोलपटाची निर्मिति कर-णारे लोक मदतीसाठी सरकारकडे आल्यास त्यांना मदत देण्याची तयारी म्हैसूरच्या मुख्य प्रधानांनीं दाखविली आहे. कानडी भाषेंत चांगले बोलपट काढण्यासाठी धंद्यांतील लोकांनीं पुढें यावें, अशी विनंति त्यांनीं केली.

## भारतांतील रेल्वेजचें कार्य

### आर्थिक व औद्योगिक परिस्थितीचें प्रतिबिंब

भारतांतील आगगाड्यांच्या मार्गांची लांबी ३४,७०५ मैल आहे. आशियांतील इतर कोणत्याहि देशांत एवढ्या लांबीचे लोहमार्ग नाहींत आणि सबंध जगांतहि भारताचा त्या बाबतींत चौथा अनुक्रम लागतो. सरकारी मालकीच्या रेल्वेजमध्यें भारतीय रेल्वेजचा अनुक्रम दुसरा आहे; पहिलें स्थान रशिअन रेल्वेजना आहे.

| देश | लोहमार्गांची लांबी (मैल) |
|---|---|
| भारत | ३४,७०५ |
| जपान | १२,४५६ |
| चीन | १९,००० (अंदाजे) |
| बर्मा | १,७८७ |
| पाकिस्तान | ७,०८२ |
| ग्रेट ब्रिटन | १९,१५१ |
| कॅनडा | ४१,१५८ |
| अमेरिका | २,२४,८१६ |
| द. आफ्रिका | १३,४१३ |
| फ्रान्स | २५,६०० |
| ऑस्ट्रेलिआ | २६,६३३ |

भारताचा विस्तार आणि लोकसंख्या ह्यांच्या मानानें हिंदी रेल्वेजचें जागतिक रेल्वेजमधील स्थान उच्च आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

| देश | प्रत्येक १००० चौरस मैल क्षेत्रामागें लोहमार्ग (मैल) |
|---|---|
| भारत | २७ |
| अमेरिका | ७४ |
| ग्रेट ब्रिटन | २०४ |
| कॅनडा | १२ |
| फ्रान्स | १२० |
| जपान | ८७ |

लोकसंख्येच्या मानानें तुलना करणेंहि बोधप्रद होईल :—

| देश | प्रत्येक १ लक्ष लोकसंख्येमागें लोहमार्ग (मैल) |
|---|---|
| भारत | ९ |
| अमेरिका | १३८ |
| ग्रेट ब्रिटन | ३७ |
| कॅनडा | २७२ |
| फ्रान्स | ६० |
| जपान | १४ |

रेल्वे मैलांचें क्षेत्रफळाशीं व लोकसंख्येशीं प्रमाण कमी असलें तरी उतारूंची वहातुक व मालाची वहातुक ह्या बाबतींत हिंदी रेल्वेजची कामगिरी समाधानकारक आहे.

जपानी रेल्वे ह्याच सर्व देशांतील रेल्वेंत उतारूंची जास्त वहातुक करतात, असें वरील तक्त्यावरून दिसून येईल. अमेरिका व कॅनडा येथें मोटारींतून वहातुक मोठ्या प्रमाणावर होतें, त्यामुळें रेल्वेजला कमी उतारू मिळतात.

### दरमाणशीं वहातुक

हिंदी रेल्वेजवरील मालाची वहातुक तुलनेनें कमी आहे, हें आपल्या औद्योगिक मागासलेपणाचें निदर्शक आहे. हिंदी रेल्वेजच्या सर्वांगीण प्रगतीला किती वाव आहे, हें खालील तुलनात्मक तक्त्यांवरून दिसून येईल. भारतांत दरमाणशीं आगगाडीच्या प्रवासाचें प्रमाण १०३ मैल होतें; ग्रेट ब्रिटनमध्यें तें ४०८ मैल, जपानमध्यें ५९९ मैल, फ्रान्समध्यें ३८५ मैल, अमेरिकेंत १८१ मैल व कॅनडांत १८० मैल होतें. भारतीय रेल्वेजनीं केलेल्या मालवहातुकीचें प्रमाण दरमाणशीं ७२ टन मैल, तर कॅनडांत तें ३,७२२ टन मैल व अमेरिकेंत ३,३८२ टन मैल पडलें. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जपान व द. आफ्रिका ह्यांचे तत्सम आंकडे ४३५, ५९३, २८५ व १,१५८ टन-मैल असे आहेत.

| | दरमाणशीं | | दरमाणशीं | |
|---|---|---|---|---|
| | उतारूंची संख्या | उतारू मैल | टनाची वहातुक | टन मैल |
| भारत | ३·५ | १०३ | ०·३०७ | ७२ |
| अमेरिका | २·७ | १८० | १४·१४९ | ३,३८२ |
| ग्रेटब्रिटन | १९·५ | ४०८ | ५·५८२ | ४३५ |
| कॅनडा | १·८ | १८१ | ८·७८९ | ३,७२२ |
| जपान | ४०·९ | ५९९ | १·६९७ | २८५ |
| फ्रान्स | ११·७ | ३८५ | ३·८८७ | ५९३ |
| द. आफ्रिका | २०·९ | उलपलब्ध नाहीं | ४·७४८ | १,१५८ |

### प्रवासाची सवय

दरमाणशीं किती उत्पन्नापैकी किती उत्पन्न रेल्वेप्रवासावर खर्च केलें जातें, हें पहाणें उद्बोधक होईल. खालील तक्त्यांत दरमाणशी राष्ट्रीय उत्पन्न, दरमाणशीं रेल्वेप्रवासावर खर्च आणि ह्या खर्चाचें दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्नाचें प्रमाण, हीं दिलीं आहेत. सोईसाठी, निरनिराळया देशांच्या चलनांचें रुपयांत रूपांतर केलें आहे.

| देश | वाहिलेले उतारू (हजार) | उतारू × मैल (हजार) | वाहिलेले टन (हजार) | टन × मैल (हजार) |
|---|---|---|---|---|
| भारत | १,३००,२२४ | ३८,६४९,३१२ | ११५,११७ | २७,०१८,६३७ |
| ग्रेट ब्रिटन | ९९१,१९३ | २०,७१२,००० | २८३,४९८ | २२,०८९,४८७ |
| कॅनडा | २७,३८८ | २,७५३,९५१ | १३३,५४४ | ५६,५५०,०४८ |
| अमेरिका | ४३९,३५६ | २९,२८६,००८ | २,२९७,९९६ | ५४९,२५८,८०० |
| फ्रान्स | ५००,३०० | १६,५०९,८०१ | १६६,५२८ | २५,४०४,०३६ |
| जपान | ३,५४६,९९५ | ५१,९१९,०१२ | १४७,१५२ | २४,७१७,८७२ |
| द. आफ्रिका | २७५,०३९ | उपलब्ध नाहीं | ६२,४४५ | १५,२३४,६०० |

| (१) देश | (२) दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्न (रु.) | (३) दर माणशीं रेल्वे-प्रवासावर खर्च (रु.) | (३) चें (२) शीं % प्रमाण |
|---|---|---|---|
| ऑस्ट्रेलिया | ४,३७२ | ४९ | १.१ |
| कॅनडा | ६,२३८ | २७ | ०.४ |
| फ्रान्स | ३,३२३ | ४० | १.२ |
| भारत | २८४ | ३ | १.१ |
| इटली | १,४२१ | १५ | १.१ |
| जपान | ९१० | १८ | २.० |
| द. आफ्रिका | १,२९३ | १६ | १.२ |
| ग्रेट ब्रिटन | ३,८८० | ३० | ०.८ |
| अमेरिका | ९,१०० | २५ | ०.३ |

हिंदी मनुष्य आपल्या उत्पन्नाच्या मानानें रेल्वेप्रवासावर कांहीं कमी प्रमाणांत खर्च करीत नाहीं! जपान वगळला, तर बाकीच्या सर्व देशांतील नागरिकांपेक्षा हिंदी नागरिकांच्या ह्या खर्चाचें प्रमाण ज्यास्त आहे. हिंदी माणसाचें दरमाणशीं उत्पन्न अत्यल्प आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे ह्या बाबतींत त्याची प्रवासप्रियता अधिकच उठून दिसते. राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ झाली, तर हिंदी रेल्वेजवरील वहातुक कितीतरी वाढूं शकेल.

### दर रेल्वे नोकरागणिक कामाचा उठाव

जपान सोडला, तर दर रेल्वे नोकरामागें कामाचा उठाव उतारू, उतारू-मैल, मैल ह्यांच्या हिशेबानें भारतांत इतर देशांचे मानानें कांहीं फार वाईट नाहीं. पण, टन व टन-मैल ह्यांच्या हिशेबानें मात्र भारत इतर सर्व देशांचे मानानें अगदीं खालीं आहे.

| देश | दर नोकरागणिक | | | |
|---|---|---|---|---|
| | उतारूंची संख्या | उतारू-मैल | टनांची वहातुक | टन-मैल |
| भारत | १,३४२ | ३९,८८२ | ११९ | २७,८८० |
| अमेरिका | ४१३ | २७,५०६ | २,१५८ | ५,१५,८७८ |
| ग्रेट ब्रिटन | १,७१७ | ३५,८८५ | ४९१ | ३८,२७१ |
| कॅनडा | १५० | १९,३७३ | ६६७ | २,७६,४३५ |
| जपान | ७,९३८ | १४,७२६ | ३२९ | ५५,३१७ |
| फ्रान्स | १,२९० | १,१६,१९२ | ४२९ | ६५,४९८ |
| द. आफ्रिका | १,४०९ | ४२,५६६ | ३२० | ७८,०४० |

यंत्रसामुग्रीचा वापर किती केला जातो ह्यावर उत्पादनक्षमता अवलंबून रहाते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यादृष्टीनें खालील आंकडे स्पष्टीकरण करतील:—

| देश | दर नोकरागणिक रेल्वेंत गुंतलेलें भांडवल (रु.) |
|---|---|
| भारत | ९,००८ |
| ग्रेट ब्रिटन | ३५,००७ |
| अमेरिका | १,४५,५७५ |
| कॅनडा | १,११,७०२ |
| द. आफ्रिका | २४,११० |

यांत्रिक हत्यारांनीं काम करणाराच्या मानानें साध्या हातानें काम करणाराची उत्पादनक्षमता कमीच असणार, हें उघड आहे. म्हणजेच, तेंच काम करायला जास्त माणसें लागणार. इतर देशांच्या मानानें भारतांत दर नोकरागणिक भांडवलाचा गुंतवणूक अत्यल्प आहे. ह्याचा अर्थ, हिंदी रेल्वेजमध्यें अधिक भांडवल गुंतविणें फायद्याचें होणार आहे.

## "वकिलानें दुसरा धंदा करूं नये"

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

वकिलीचा धंदा करीत असतांना मुंढाडे या वकिलानें इतर धंदे केल्याच्या आरोपावरून जळगांव येथील डिस्ट्रिक्ट जज्जानें मुंबई प्लीडर्स ॲक्ट, क. २६ खालीं हायकोर्टाला रेफरन्स केला. मुंढाडेवरील आरोपाचें स्वरूप असें होतें कीं, वकिलीचा धंदा करीत असतांना त्यांनीं पुढें दिलेले धंदे केले: (१) रामचंद्र मुंढाडे, वकील या नांवानें चालविलेलें कमिशन एजन्सीचें दुकान (२) ग्रोसरीचें दुकान आणि (३) जयहिंद ट्रेडिंग कंपनी या नांवानें चालविलेला सिमेंटचा धंदा.

कमिशन एजन्सीच्या धंद्यासंबंधीं मुंढाडेचें म्हणणें असें होतें कीं, तो धंदा आपल्या वडिलांचा असून केवळ तो गुंडाळण्याच्या दृष्टीनें आपण चालवीत होतों. डिस्ट्रिक्ट जज्जाला या म्हणण्यांत तथ्य आढळून आलें नाहीं.

ग्रोसरी दुकानासंबंधीं मुंढाडेचें म्हणणें असें होतें कीं, तें दुकान आपल्या मुलाचें आहे. हें म्हणणें डिस्ट्रिक्ट जज्जानें खोडून काढलें; कारण त्यावेळीं मुंढाडेचा मुलगा अज्ञान होता आणि सदरहू दुकान मुंढाडेच्या राहत्या घरींच होतें.

हायकोर्टांत मुंढाडेतर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, कायद्याच्या दृष्टीनें आपल्या वर्तणुकीला गैरवर्तणूक म्हणतां येणार नाहीं.

### सन्माननीय धंद्याची परंपरा

"हा युक्तिवाद हायकोर्टाला पटला नाहीं. वकिलीचा धंदा करीत असतांना वकिलानें दुसरा धंदा करणें योग्य नव्हे. वकिलीचा धंदा हा एक सन्माननीय धंदा समजला गेला आहे. त्या धंद्याला उच्च प्रकारची वर्तणूक आणि परंपरा यांची आवश्यकता असते. अशा उच्च प्रकारच्या वर्तणुकीशीं विसंगत अशी जर वर्तणूक एखाद्या वकिलानें दाखविली तर कोर्टाच्या दृष्टीनें तें ठीक समजलें जाणार नाहीं.

"वकिलीचा धंदा करीत असतांना वकिलानें दुसरा धंदा करणें योग्य नव्हे असा निकाल कित्येक हायकोर्टांनीं आपल्या निवाड्यांत दिलेला आहे. आपल्या देशांत वकिलीच्या धंद्याला अतिशय मानाचें स्थान आहे. वकील लोकांनीं तें स्थान टिकविण्याच्या दृष्टीनें आपली वर्तणूक ठेवली पाहिजे. आपली नीतिमत्ता चांगली ठेवून योग्य दिसेल असेंच कृत्य वकीललोकांनीं केलें पाहिजे. असें जर झालें तरच वकिलीच्या धंद्याला जें मानाचें स्थान आहे तें टिकेल."

वकिलीचा धंदा करीपर्यंत आपण दुसरा धंदा करणार नाहीं असें आश्वासन मुंढाडे वकिलानें दिल्यामुळें सदरहू केसमधील मुंढाडेची वर्तणूक योग्य नव्हती, एवढेंच मत व्यक्त करण्याखेरीज दुसरा हुकूम हायकोर्टानें दिला नाहीं.

**विधानसभेसाठी इमारत**—पंजाब राज्य सरकारनें विधान सभेच्या बैठकीसाठी चंदीगड येथें एक नवीन इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. इमारतीच्या कामाला लवकरच प्रारंभ होईल. इमारतीसाठी ६८ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

## सहकारी न्यायदान सहकारी कोर्टाकडूनच झालें पाहिजे!

( लेखक : स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल. बी., पुणें ४ )

सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांतील कलम ५४ अन्वयें सहकारी न्यायदान करणेसाठीं प्रांतांत सहकारी कोर्टें स्थापन केलेलीं असून त्यामार्फत सहकारी तंट्यांचा अगर वादांचा निर्णय केला जातो. सहकारी न्यायदानपद्धतीचें प्रांतांत सर्वत्र स्वागत झालेलें आहे; आणि खऱ्या अर्थानें सहकारी न्यायालयास 'जनतेचें न्यायालय' असें समजलें जात आहे. सहकारी न्यायदानपद्धति सदोष असून त्यांत आमूलाग्र बदल करावा असें प्रतिपादन करणारी कांहीं मंडळी आहेत. सहकारी दावे अगर वाद सहकारी न्यायालयांत चालवावेत याबाबतचा कायदा करतांना त्यामागील उद्देश विचारांत घेणें जरूर आहे. दिवाणी अगर मुलकी कोर्टांतील न्यायदान कमालीचें खर्चिक होऊन बसलें असून न्यायदानाचे कामीं बरीच दिरंगाई झालेली अवलोकनांत येते. ह्या दोन प्रमुख गोष्टींना आळा बसावा या सद्हेतूनें प्रांतांत सहकारी न्यायालयाची स्थापना झालेली आहे. कलम ५४ अन्वयें उपस्थित झालेल्या वादांचा निर्णय दोन महिन्यांच्या आंत व्हावयास पाहिजे अशी तरतूद असलेमुळें दाव्याचे निर्णयाचे कामीं विलंब होत नाहीं. न्यायदानाचे कामीं दिरंगाई झाल्यास त्याचीं कटु फळें सर्वांसच भोगावीं लागतात व पक्षकार त्यामुळें हतबल होतात. तसेंच दिवाणी कोर्टांतील न्यायदानाचे कामीं पक्षकारांना फार खर्च करावा लागलेमुळें दावा जिंकूनहि पदरांत फारसें यश पडलें असें तें समजत नाहींत. न्यायदानाचे कामीं विलंब होणें म्हणजे न्यायदान नाकारणें होय, अशी भावना समाजांत फार मोठ्या प्रमाणावर प्रसृत झालेली आहे. अशा वेळीं सहकारी न्यायालयें बंद करून तेथील काम दिवाणी न्यायालयांत नेणें फारसें युक्त ठरणार नाहीं. खर्चाचे दृष्टीनें विचार केल्यास दिवाणी न्यायालयांतील न्यायदान अतिशय महाग व जिकीरीचें झालें आहे. दाव्यांतील येणें रकमेच्या मागणीवर कोर्ट फी स्टँपाची तरतुद करतां करतां पक्षकारांना जीव नकोसा होऊन जातो. सहकारी न्यायालयांतील कामें बंद करून दिवाणी कोर्टाकडे न्यायदानाचें काम सोंपवावें असें म्हणतांना असें प्रतिपादन केलें जातें कीं, सहकारी न्यायालयांत चालणाऱ्या दाव्यांचे कामीं वकीलवर्ग उपस्थित राहूं शकत नाहीं; कारण सहकारी कायद्यानें त्यावर बंधन घातलें आहे. कांहीं क्लिष्ट व कायदेशीर गुंतागुंतीच्या दाव्यांत व पैक्याच्या भारी दाव्यांत वकिलांस उपस्थिति करून दिली पाहिजे व त्याबाबत योग्य ती तरतुद सहकारी कायद्यांत करणें सर्वांस श्रेयस्कर व हितकारक ठरेल. कांहीं कायदेशीर महत्वाच्या दाव्यांत तज्ज्ञ मंडळींची मदत घेतल्याशिवाय पक्षकारांना त्यांची बाजू समर्थपणें लवाद-न्यायाधीशासमोर मांडतां येत नाहीं. हें म्हणणें सार्थ आहे हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं, परंतु तेवढ्याच कारणावरून सहकारी न्यायालयें बंद करावींत व सहकारी न्यायदान दिवाणी कोर्टांत व्हावें असें म्हणणें योग्य व वाजवी ठरणार नाहीं. सहकारी न्यायदानांतील विशिष्ट कार्यपद्धति विचारांत घेतल्यास अशा तऱ्हेची कार्यपद्धति दिवाणी न्यायालयांत आणून त्या पद्धतीनें न्यायदान करणें सुलभ होणार नाहीं. दिवाणी न्यायालयांत जाणारा पक्षकारांचा वेळ, श्रम व खर्च यांचा विचार करतांना सहकारी न्यायालयांमार्फत होणारें न्यायदान कमी खर्चाचें व विनाविलंब होतें असें म्हणणें क्रमप्राप्तच होय. सहकारी न्यायालयें हीं 'फिरती' ठेवलेलीं असलेमुळें व न्यायालयापुढें उपस्थित झालेले वाद सुलभ व सोपें असलेमुळें पक्षकारांना न्यायदान झाल्याची जाणीव प्रत्यहीं मिळते. कर्जरोख्यावर घेतलेल्या कर्जाची वेळेवर फेड न केलेमुळें अथवा गहाणखतावर घेतलेल्या रकमेची ठरलेल्या मुदतींत परतफेड न झालेमुळें निर्माण होणाऱ्या दाव्यांत फारशी चिकित्सक बुद्धि वापरणेची जरूरी येत नाहीं; व अशाच प्रकारचे बहुसंख्य दावे असतात. अशा दाव्यांत तज्ज्ञ मंडळींची मदत घेतली तरी त्यांतून निराळें कांहीं निष्पन्न होईल असें समजतां यावयाचें नाहीं. सहकारी न्यायालयें न्यायदान करतांना कायदेशीर तांत्रिक मुद्यांचा फारसा विचार करीत नाहींत. सद्सद्विवेकबुद्धि, न्यायबुद्धि ह्यांवर अवलंबून राहून न्यायदान होत असतांना तें सर्वांस हितावह नाहीं, असें कोणी म्हणणार नाहीं. हल्लीं मुलकी कोर्टांना कूळकायद्यांतील तरतुदींप्रमाणें न्यायदानाचे अधिकार दिलेले आहेत. त्या कामांतहि तज्ज्ञ अशा वकीलवर्गाची मदत घेतां येत नाहीं; तरीहि त्या कायद्याप्रमाणें केलेलें न्यायदान अयोग्य अगर अन्यायी आहे असें कोणी समजत नाहीं. श्रेष्ठ न्यायदान समजतांना दोनच कसोट्या लावल्या जातात; एक म्हणजे विनाविलंब न्यायदान होणें व दुसरें म्हणजे तें न्यायदान बिनखर्ची झालें पाहिजे. ह्या दोन्ही निकषावर सहकारी न्यायदान घासून पाहिल्यास प्रांतांतील सहकारी न्यायदान श्रेष्ठ आहे हेंच म्हणणें सर्वांस पटेल.

---

### आशिआंतील सहकारी चळवळीबद्दल इषारा

इंटर नॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स ह्या संस्थेचे प्रतिनिधी म्हणून डॉ. केलर ह्या गृहस्थांनीं आशिआंतील बऱ्याच देशांचा दौरा केला. दौऱ्यांत आलेला अनुभव ग्रथित करतांना ते म्हणतात कीं, आशिआंतील सहकारी चळवळीची सध्यांची परिस्थिति व भवितव्य ह्यांचा विचार करतांना एक इषारा देणें अगत्याचें आहे. सहकारी चळवळींत कांहीं वेळां सरकारी अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप इतक्या थरापर्यंत जातो कीं, सर्व कारभार अधिकारीच चालवितात असें म्हणण्याची पाळी येते. ही गोष्ट शेतीच्या सहकारी संस्था व हस्तव्यवसायाच्या संस्था ह्या दोन्ही प्रकारांना लागू आहे. त्यामुळें सहकारी चळवळ ही खरीखुरी लोकशाही संघटना होण्याऐवजीं तिला सरकारी कार्यक्रमाचें स्वरूप येण्याचा धोका आहे.

---

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें २

#### वासंतिक शास्त्रीय व औद्योगिक व्याख्यानमाला

दि. २ मे ते ३१ मे, १९५७

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या शिक्षण-विभागाच्या विद्यमानें प्रतिवर्षीप्रमाणेंच यंदाहि वासंतिक शास्त्रीय व औद्योगिक व्याख्यानमाला दिनांक २ मे ते ३१ मे अखेर भरविण्यांत येणार आहे. व्याख्यानें बुधवारखेरीज करून दररोज सकाळीं ९ ते १० या वेळांत कॉमनवेल्थ इमारतींतील संग्रहालयाच्या सभागृहांत होतील. प्रवेश विनामूल्य राहील. तरी सर्वांनीं या व्याख्यानमालेचा फायदा घ्यावा अशी विनंती आहे.

गो. बा. सरदेसाई
क्यूरेटर

---

**भारत-दर्शन यात्रा**—बिहारमधील ४०० विद्यार्थी १५ जूनला भारत-दर्शनाच्या प्रवासाला निघणार आहेत. त्यांच्या प्रवासासाठी खास गाडीची सोय करण्यांत आली आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांत विकासाच्या ज्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत त्यांना भेट देण्याचा विद्यार्थ्यांचा मुख्य हेतु आहे.

## रिझर्व्ह बँकेचा दक्षतेचा कारभार

माझ्या नात्यांतल्या एका मुलीचा अमेरिकेंत विवाह व्हावयाचा आहे. त्यासाठीं एक मंगळसूत्र येथून पाठवावयाचें होतें. मंगळसूत्रांत सोन्याचा मोठा अंश असतो आणि सोन्याच्या निर्गतीस रिझर्व्ह बँकेची परवानगी लागते. ही परवानगी मिळविण्यासाठीं रिझर्व्ह बँकेकडे मी अर्ज केला. त्या अर्जाप्रमाणें, अगदीं थोड्याच दिवसांत सोन्याचा दागिना अमेरिकेकडे निर्गत करण्याचा परवाना रिझर्व्ह बँकेकडून मिळाला. साध्या कागदावरील, दोन ओळींच्या पत्रावरून, रिझर्व्ह बँकेनें परवाना धाडला; कोणतीहि अडचण भासली नाहीं.

मीं ज्या पाकिटांतून अर्ज पाठविला, त्यांत बँकेच्या अधिकाऱ्यांना १२ आण्यांचीं पावतीचीं तिकिटें सांपडलीं असें बँकेनें मला कळविलें व हीं तिकिटें कशासाठीं धाडलीं होतीं, ह्याची बँकेनें माझ्याकडे विचारणा केली. "पाकिटांत चुकीनें तिकिटें राहून गेलीं असावींत; त्यांची योग्य वाटेल ती व्यवस्था करावी," असें मी उत्तर पाठविलें. उलट टपालीं, रजिस्टर्ड पोस्टानें, १२ आण्यांचीं तिकिटें मला मिळालीं ! टपालखर्च बँकनेंच सोसला.

रिझर्व्ह बँकेच्या एक्सचेंज कंट्रोल खात्याच्या दक्षतेचा हा अनुभव मला विशेष आनंदायक वाटला. रिझर्व्ह बँक ही इतर बँकांना मार्गदर्शन करीत असते, तें केवळ तात्त्विक व कागदी नसून, रिझर्व्ह बँकेचा स्वतःचा कारभारहि आदर्श असणारच असें हें उदाहरण सांगतें. नेहमीं विलंब आणि अडचणी ह्यांचा सराव झाल्यामुळें, साधें कर्तव्यपालनहि किती कौतुकास्पद वाटतें ! रिझर्व्ह बँकेच्या एक्सचेंज कंट्रोल खात्याचें हार्दिक अभिनंदन !

श्री. वा. काळे; संपादक 'अर्थ', पुणें,

---

**पाण्याचा तुटवडा पडणार**—सॅन फ्रॅन्सिस्को येथें पाटबंधारे व पूरनियंत्रणविषयक आंतरराष्ट्रीय कमिशनचें ३ रें अधिवेशन भरलें होतें. परिषदेंत असा इषारा देण्यांत आला कीं, वाढत्या लोकसंख्येमुळें जगांत पाण्याचा तुटवडा पडण्याची भीति उत्पन्न झाली आहे. १९०० मध्यें जगांतील पाटबंधाऱ्याखालील जमीन १० कोटी एकर होती, ती आतां ३० कोटी एकर झाली आहे, अशी माहिती परिषदेंत सांगण्यांत आली.

**मलायाला डॉक्टर्स पाहिजेत**—मलायामध्यें डॉक्टर्सची टंचाई भासत असल्यामुळें भारतामधून डॉक्टर्सना नोकरीवर घेण्याची परवानगी सरकारनें भारताच्या सरकारकडे मागितली आहे. भारतामधून १०० डॉक्टर्सची भरती करण्यासाठीं त्या सरकारचें एक निवड मंडळ लवकरच भारतांत येणार आहे.

**शालेय पुस्तकांची छपाई**—शाळेंत लागणाऱ्या क्रमिक पुस्तकांचें मुद्रण राज्य सरकारच्या शिक्षणखात्यातर्फे करण्याचा विचार चालू आहे, असें आंध्र राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे. पुस्तकांचें लेखन तज्ज्ञ लेखकांकडून करवून घेण्यांत येणार असून त्याबद्दल त्यांना मेहनताना दिला जाईल. पुस्तकें किमान तीन वर्षें तरी चालतील.

**इंडोनेशिआला अमेरिकेचें कर्ज**— इंडोनेशिआच्या सरकारला अमेरिकेनें १·५ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. सुमात्रा बेटांत ३०० मैल लांबीचा एक मोठा रस्ता करण्यासाठीं आणि सुमारें ३० शहरांना विजेचा पुरवठा करण्यासाठीं ह्या रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) — श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. खाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

## मुंबई राज्यांतील अल्प बचत मोहीम

### १९५७–५८ सालीं १९·१७ कोटी रु. उभारणार

१९५७–५८ या आर्थिक वर्षातील मुंबई राज्यांमधील निरनिराळ्या जिल्ह्यांची अल्प बचत मोहीमेखालील उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं असून सबंध राज्याची मिळून ही रक्कम २,६२६·७० लाख रु. इतकी आहे. त्यांपैकी ११०० लाख रु. बृहन्मुंबईत जमा करावयाचे असून उरलेले निरनिराळ्या जिल्ह्यांमध्यें पुढील-प्रमाणें वाटून देण्यांत आले आहेत. :—

कच्छ ( ३० लाख रु. ), हलार ( २६ लाख रु. ), मध्य-सौराष्ट्र ( ४६ लाख रु. ), झलवाड ( १५ लाख रु. ), गोहिलवाड ( ४३ लाख रु. ), सोरठ ( ३० लाख रु. ), अमरेली ( ९ लाख रु. ), बनासकांठा ( १२ लाख रु. ), साबरकांठा ( १३ लाख रु. ), मेहसाणा ( २० लाख रु. ), अहमदाबाद ( १५० लाख रु. ), खेडा ( १२५ लाख रु. ), पंचमहाल ( २४ लाख रु. ), बडोदें ( ५० लाख रु. ), भडोच ( १७ लाख रु. ), सुरत ( १२५ लाख रु. ), डांग ( ७५००० रु. ), नाशिक ( ३८ लाख रु. ), ठाणें ( ४७ लाख रु. ), पश्चिम खानदेश ( २६ लाख रु. ), कुलाबा ( १८ लाख रु. ), रत्नागिरी ( २० लाख रु. ), अहमदनगर ( २५ लाख रु. ), पुणें ( ११० लाख रु. ), उत्तर सातारा ( २५ लाख रु. ), दक्षिण सातारा ( २८ लाख रु. ), कोल्हापूर ( ४५ लाख रु. ), सोलापूर ( ५० लाख रु. ), पूर्व खानदेश ( ३० लाख रु. ), औरंगाबाद ( २३ लाख रु. ), परभणी ( २० लाख रु. ), बीड ( १५ लाख रु. ), अकोला ( २४ लाख रु. ), अमरावती ( २८ लाख रु. ), नांदेड ( १८ लाख रु. ), बुलढाणा ( २० लाख रु. ), अकोला ( २४ लाख रु. ), अमरावती ( २८ लाख रु. ), यवतमाळ ( १९ लाख रु. ), वर्धा ( १४ लाख रु. ), नागपूर ( ४५ लाख रु. ), चांदा ( १९ लाख रु. ), भंडारा ( २० लाख रु. ),

मागें जमविण्यांत आलेल्या एकूण रकमा, पिकांची स्थिति, त्याचप्रमाणें ग्रामीण भागांतील लोकांची वर्गणी देण्याची कुवत, प्रत्येक जिल्ह्याची औद्योगिक प्रगति आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी सबंध राज्याचा वार्षिक संकल्प, वगैरे बाबी लक्षांत घेऊन वरील प्रमाणें उद्दिष्टें ठरविण्यांत आलीं आहेत.

---

### 'गर्जना' वर्षारंभ विशेषांक

कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध गर्जना साप्ताहिकानें आपला १५ व्या वर्षाचा पहिला अंक विशेषांक म्हणून प्रसिद्ध केला आहे. निर्भीडपणें गाऱ्हाणीं मांडून व स्पष्टपणें अन्यायाला वाचा फोडून गर्जनाकारांनीं 'गर्जना' हें आपल्या साप्ताहिकाचें नांव सार्थ केलें आहे; आणि प्रतिकूल परिस्थितीमधील त्याचें सातत्य लक्षांत घेतलें म्हणजे श्री. गणपतराव पाध्ये ह्यांच्या चिकाटीचें व निर्भीडपणाचें कौतुक वाटतें. पत्रकार स्वतंत्र बाण्याचा असला, म्हणजे त्याचे हातुन कितीतरी कामगिरी होऊं शकते, ह्याचें गर्जनाकार हें उत्कृष्ट उदाहरण आहे. अर्थात्, सामान्य जनतेच्या पातळीवरच असेर बरेंच अवलंबून रहातें; आणि म्हणून तर नैराश्येला एकाकी टक्कर देणाराचें विशेष अभिनंदन करावेसें वाटतें.

---

### इंडियन नॅशनल बँक लि., कलकत्ता

कलकत्ता येथील इंडियन नॅशनल बँक लि. ला रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स नाकारला आहे.

### पाकिस्तानांतील बँकांमध्यें असलेले लॉकर आणि सेफ डिपॉझिटें

पुढील बँकांत निर्वासितांचे जे लॉकर व सेफ डिपॉझिटें आहेत त्यांची यादी पाकिस्तान सरकारकडून मिळाली आहे. ( १ ) भारतनिधि लिमिटेड, दी माल ( पूर्वीची भारत बँक लिमिटेड, माल, लाहोर ), ( २ ) सेंट्रल बँक ऑफ इंडिया लिमिटेड, मुलतान. ( ३ ) नॅशनल बँक ऑफ लाहोर, ( ४ ) सेंट्रल बँक ऑफ इंडिया, लाहोर, ( ५ ) नॅशनल बँक ऑफ लाहोर, ( ६ ) लाहोर सेफ डिपॉझिटस व्हॉल्ट आणि ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स, ( ७ ) स्टेट बँक ऑफ इंडिया, कराची, ( ८ ) सेक्युरिटी सेफ डिपॉझिटस कं. लिमिटेड, कराची, ( ९ ) स्टेट बँक ऑफ इंडिया बाहवलपूर, आणि ( १० ) ग्रिंडलेज बँक लिमिटेड केंद्रा.

ज्या निर्वासितांच्या उपर्युक्त बँकांमध्यें लॉकर व सेफ डिपॉझिटस होते त्यांनीं आपले हल्लींचे पत्ते भारत सरकारचे पुनर्वसाहत खातें, नवी दिल्ली, यांच्याकडे कळवावे.

---

### सर जनार्दन स्मारक फंड

१९४२ ते १९५६ अखेर बॅंबे प्रॉ. को. इन्स्टिटयूटचे चेअरमन असलेले सर जनार्दन आत्माराम मदन हे २१ फेब्रुवारी १९५७ रोजीं निवर्तले. १९ मार्च १९५७ रोजीं श्री. जी. पी. मुर्डेश्वर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेनें ठराव करून इन्स्टिटयूटनें कै. सर जनार्दन मदन ह्यांच्या स्मारकासाठीं एक फंड सुरू करावा, असें ठरविलें. त्याप्रमाणें आतां फंड उभारण्यांत येत आहे. ह्या फंडांतून सहकारी शिक्षणाच्या प्रसारास हातभार लावला जावा, सहकारी ट्रेनिंग कॉलेजांतून शिष्यवृत्त्या किंवा बक्षिसें ठेवलीं जावीं, अशी योजना आहे. स्मारकाचें निश्चित स्वरूप जमलेल्या रकमेवर अवलंबून राहील. १५ ऑक्टोबर १९५७ रोजीं फंड बंद केला जाईल.

---

### पोस्टाच्या आयुर्विमापत्रांवरील हप्ते

पोस्टाच्या आयुर्विमापत्रांवर ( होल लाइफ ) विमेदारास आजन्म हप्ता भरावा लागतो. तथापि अशा विमापत्रांवर हप्ते घेण्याची वयोमर्यादा निश्चित करण्याचा निर्णय आतां भारत सरकारनें घेतला आहे. अशा स्वरूपाच्या विमापत्रांच्या विमेदारांना वयाच्या ८५ वर्षांनंतर हप्ते भरावे लागणार नाहींत. हा हुकूम १ एप्रिल १९५७ पासून लागू करण्यांत आला असून अशा विमेदारांकडून कांहीं हप्ते वसूल केले असल्यास त्याची छाननी करून ते परत केले जातील.

---

### 'इन्कम टॅक्स फॉर दि लेमॅन'

( सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हिन्यूचें प्रकाशन )

दि सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हिन्यूनें 'इन्कम टॅक्स फॉर दि लेमॅन' या प्रकाशनाची एक नवी आवृत्ति काढली आहे. या प्रकाशनांत 'दि इन्कम टॅक्स ॲक्ट, १९५६ ( नं. १८–१९५६ )' हा कायदा सोप्या भाषेंत विशद करून सांगण्यांत आला आहे. या प्रकाशनांत तांत्रिक संज्ञा शक्य तो टाळण्यांत आल्या आहेत. ज्या ठिकाणीं हें अशक्य होतें त्या ठिकाणीं कायद्याचा अर्थ चुकीचा न होण्याची खबरदारी घेऊन सोइस्कर अशा उदाहरणांनीं स्पष्टीकरण देण्यांत आलें आहे. यांत नकाशे, तक्ते इ. चा समावेश होतो.

ही पुस्तिका प्रथम १९५३ मध्यें छापण्यांत आली. आतांपर्यंत या प्रकाशनाच्या तीन आवृत्त्या निघाल्या असून २५,००० प्रती छापण्यांत आल्या होत्या.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.